# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक २४ मार्च, २०२३

## (सकाळी १०-०० ते ११-४५ वाजेपर्यंत)

असुधारित प्रत

**अर्धा-तास चर्चा – म.वि.प. नियम ९२ अन्वये -**

**(सोमवार, दिनांक १३ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक १]**

(१) **सर्वश्री राजहंस सिंह,** प्रविण दरेकर, प्रसाद लाड, **वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबई शहराच्या १ कोटी ३० लाख लोकसंख्येकरीता ३ हजार ८५० एमएलडी पाणी पूर्तता केली जात असणे, सन २०४१ पर्यंत मुंबई शहराची लोकसंख्या १ कोटी ७० लाखांपर्यंत जाण्याची शक्यता असणे, त्यावेळी मुंबई शहराला प्रतिदिन ६५३५ एमएलडी पाण्याची आवश्यकता राहील याचा अंदाज करुन, त्यानुसार मुंबई शहराची पाणी समस्या सोडविण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे, मुंबई शहराकरिता पाणीपुरवठा करणारे तानसा, मोडक सागर, अप्पर वैतरणा, मध्य वैतरणा व भातसा धरण हे १५० कि.मी. दूर अंतरावर असल्यामुळे २० ते २५ टक्के पाणी गळती व पाणी चोरी होत असणे, त्यामुळे मुंबई शहराला अपुरा पाणीपुरवठा होणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील अधिकारी आणि पाणी माफीयांचे संगनमत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली असणे, सदर प्रकारास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने भविष्यात उद्‌भवणाऱ्या अपुऱ्या पाणीपुरवठ्याच्या समस्यांचे कायमस्वरुपी निवारण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक २ व ३]**

(२) **श्रीमती उमा खापरे,** श्री. रमेश पाटील, ॲड. निरंजन डावखरे, **वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"देहू रोड (जि.पुणे) येथील दारुगोळा कारखान्याच्या सुरक्षिततेच्या

दृष्टीने कारखान्याच्या सीमा भिंतीपासून १.८२ किलोमीटर (२००० यार्डस) अंतरामधील क्षेत्र हे संरक्षित ना-विकास क्षेत्र (रेड झोन) म्हणून कायम करण्याबाबत संरक्षण विभागाच्या बोर्ड ऑफीसरच्या बैठकीत शिफारस करण्यात येणे, त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील भागाचा नव्याने ना-विकास क्षेत्रात (रेड झोन) समावेश होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास येणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने विकास योजना तयार करतांना रावेत आणि किवळे या गावांचा चिखली तळवडे या समाविष्ट गावांमध्ये संरक्षण खात्याच्या मागणीप्रमाणे संरक्षित क्षेत्र प्रस्तावित केले असणे, मात्र त्यावेळी रावेत आणि किवळे येथील क्षेत्राबाबत देहू रोड दारुगोळा कारखान्याकडून कोणतीही हरकत घेतली नसल्यामुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून सदर क्षेत्र निवासी प्रयोजनासाठी प्रस्तावित करण्यात आले असणे, तसेच २००० यार्डस पर्यंत हद्द कायम केल्यास निम्म्याहून अधिक पिंपरी-चिंचवड शहर (रेड झोन) बाधित होणार असणे, त्यामुळे भविष्यात सदर भागात कोणताही विकास होणार नसून गत अनेक वर्षांपासून हद्द कमी करण्याची मागणी करणाऱ्यांवर अन्याय होणार असणे, सदर प्रकरणी राज्य शासनाने मा.संरक्षण मंत्री, भारत सरकार महोदयांकडे बैठक घेऊन बाधित क्षेत्रातील नागरिकांना दिलासा देण्याची स्थानिकांकडून मागणी होत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **सर्वश्री अभिजित वंजारी**, सुधाकर अडबाले, राजेश राठोड, **वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"गडचिरोली जिल्हयातील सुरजागड येथे भारतातील सर्वात चांगल्या प्रतिचे लोह खनिजाचे उत्खनन केले जाणे, परंतु गेल्या १५-१६ वर्षांपासून या प्रकल्पाच्या कार्यपध्दतीवर स्थानिक प्रशासनाच्या भूमिकेनुसार व कराराप्रमाणे कोनसरी येथे भिलाई स्टील प्लॅन्टच्या धर्तीवर त्यापेक्षा जास्त क्षमतेचा पोलाद कारखाना सुरू करण्याच्या शासनाच्या भूमिकेबाबत सर्वसामान्य जनतेमध्ये शंका निर्माण होणे, ठेका दिलेल्या कंपनीने किती उत्खनन केले, कराराप्रमाणे किती स्थानिक युवकांना रोजगार दिला व शासनाला या प्रकल्पामधून नेमका किती महसूल प्राप्त झाला यात समन्वय नसणे, उलट नक्षलग्रस्त जिल्हा म्हणून शासनाच्या वतीने करार केलेल्या कंपनीला व त्यांच्या अधिकाऱ्याला मोठ्या प्रमाणात सुरक्षा देवून करारापेक्षाही अधिक प्रमाणात, अवैध उत्खनन करण्याचे काम तेथे सुरू असणे, उच्चप्रतीचे लोह खनिज गडचिरोली जिल्ह्यात

अग्रिम प्रत

आढळल्याने तेथील अवैध उत्खननास स्थानिक प्रशासन व शासन मदत करतेय अशी भावना स्थानिक आदिवासींमध्ये निर्माण होणे, त्यासाठी कोनसरीचा प्रकल्प लवकरात लवकर व्हावा व स्थानिक युवकांना रोजगार मिळावा, सुरजागड प्रकल्पाच्या उत्खननाकरिता करार झालेल्या कंपनींच्या सी.एस.आर. चा निधी हा स्थानिक विकासाकरिता उपयोगी होणे तसेच कंपनीद्वारे अवैध उत्खनन थांबविण्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावर संगणक व सॉफ्टवेअर प्रणालीद्वारे डॅशबोर्ड तयार करून व जी.पी.एस. आणि सी.सी.टिव्ही कॅमेऱ्याच्या मदतीने उत्खननाचे कार्य वैधरित्या व्हावे, याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(बुधवार, दिनांक १५ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक ४]**

(४) **सर्वश्री अमोल मिटकरी**, शशिकांत शिंदे, विक्रम काळे, **वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"शिवनी (जि.अकोला) येथे सन १९४३ मध्ये विमानतळाची उभारणी करण्यात येणे, सदर विमानतळाचे विस्तारीकरणाकरीता माहे डिसेंबर, २०१९ मध्ये जिल्हाधिकारी, अकोला यांनी २२.२४ हेक्टर जमिनीची आवश्यकता असल्याचे नमूद करणे, त्यानुसार डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या मालकीची एकूण ६०.६८ हेक्टर जमीन संपादित करण्यात येणे, त्याकरीता रुपये १०० कोटी निधीची आवश्यकता असणे, त्यासंदर्भात मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ७ फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत शिवनी (अकोला) विमानतळाच्या विकास व विस्तारीकरणाबाबत व्यवहार्यताबाबतचा अभ्यास करुन त्याबाबतचा अहवाल सादर करण्याचे सुचविण्यात येणे, अकोला शहरापासून लगतच शेगाव तीर्थक्षेत्र, कारंजा येथील श्री गुरु मंदिर तीर्थक्षेत्र, काटेल, बुलढाणा येथे श्री संत गुलाब बाबा तीर्थक्षेत्र तसेच नरनाळा अभयारण्य इ. पर्यटन स्थळे असणे, त्याचप्रमाणे डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ वास्तू असणे, अकोला व खामगाव येथील एमआयडीसीमध्ये मोठया प्रमाणात उद्योग असून औद्योगिकरणाची वाढ करण्याचे व बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने अकोला विमानतळाचे विस्तारीकरण करण्याची आवश्यकता असणे, याबाबत स्थानिक नागरिक व उद्योजकांकडून मागणी होत असणे, त्यामुळे शिवणी (जि.अकोला) येथील विमानतळाच्या धावपट्टी विस्तारीकरणाचे काम करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

अप्रकाशित प्रत

**(गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३, मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३ व गुरूवार, दिनांक २३ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक ५]**

(५) **सर्वश्री सचिन अहिर,** विलास पोतनीस, सुनिल शिंदे, **वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"चुनाभट्टी (मुंबई) येथील टाटानगर इमारत वसाहतीमध्ये १२२ कुटुंबे २१ वर्षांपासून वास्तव्यास असणे, सदर ठिकाणची स्वदेशी मिल दिवाळखोरीत गेल्याने मिल बंद असणे, मिल बंद असल्याकारणामुळे टाटानगर इमारत वसाहतीची देखभाल, डागडुजीची कामे बंद असणे, त्यामुळे जीर्ण झालेल्या इमारतींवर मोठ्या प्रमाणावर झाडे-झुडपे वाढून इमारतींची दुरवस्था झाली असणे, इमारतींवर वाढलेल्या झाडा-झुडपांमुळे इमारतींचा भाग वारंवार कोसळत असणे, पावसाळ्यातही पावसाचे पाणी घरात येऊन इमारत परिसरात वारंवार शॉर्टसर्किट चे प्रकार होत असणे, याप्रकरणी तेथील रहिवाशांनी शासनाकडे अनेकदा तक्रारी करुनसुध्दा शासनाकडून दखल घेतली जात नसणे, त्यामुळे दुरवस्थेतील सदर इमारत कोसळण्याची शक्यता निर्माण होऊन रहिवाशांच्या जीवितास धोका निर्माण झाला असणे, याबाबत शासनाने चौकशी करुन टाटानगर इमारत वसाहतीची तात्काळ देखभाल, दुरुस्ती अथवा पुनर्बांधणी करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

**(गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक ६]**

(६) **सर्वश्री विलास पोतनीस,** सुनिल शिंदे, ॲड अनिल परब, **वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबई शहरात वाढत्या संसर्गजन्य साथीच्या आजारावरील उपचारासाठी रुग्णांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १२० वर्षे जुन्या कस्तुरबा रुग्णालयावर अवलंबून राहावे लागत असणे, सन १८९२ मध्ये बांधलेल्या कस्तुरबा रुग्णालयात सर्व प्रकारच्या संसर्गजन्य आजारांवर उपचार देण्यासाठी स्वतंत्र कक्षाची व्यवस्था असणे, संसर्गजन्य आजार इतर रुग्णांना होऊ नये, याकरिता विशेषत: कस्तुरबा रुग्णालयाची निर्मिती करण्यात आलेली असणे, गत वर्षात कोरोना, स्वाईन फ्ल्यू, कावीळ, मलेरिया, कुष्ठरोग, कांजण्या,

अप्रकाशित

गोवर, क्षयरोग, अतिसार व इबोला यांसारख्या आजारांनी ग्रस्त रुग्णांवर कस्तुरबा रुग्णालयात प्रभावी उपचार करण्यात आले असणे, तसेच मुंबईसह राज्यात वाढत्या गोवर साथीत बाधित रुग्णांवर कस्तुरबा रुग्णालयाकडून चांगल्याप्रकारे उपचार करण्यात येणे, मुंबई शहराच्या वाढत्या लोकसंख्येमुळे मुंबई शहरातील वाढत्या संसर्गजन्य आजारांवर उपचार करण्यासाठी स्वतंत्र रुग्णालय नसल्याने अनेक रुग्णांना कस्तुरबा रुग्णालयातच उपचारासाठी पाठविण्यात येणे, त्यामुळे कस्तुरबा रुग्णालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण येत असणे, त्याकरीता मुंबईत साथीच्या आजारावर उपचार करण्यासाठी आणखी एक स्वतंत्र रुग्णालय उभारण्याची आवश्यकता असणे, तत्कालीन शासनाच्या काळात मुलुंड येथे विशेष रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असणे, त्यामुळे मुंबई उपनगरात संसर्गजन्य आजारावर उपचार करण्यासाठी कस्तुरबा रुग्णालयाच्या धर्तीवर एक स्वतंत्र रुग्णालय उभारण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

**(सोमवार, दिनांक २० मार्च, २०२३, मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३ व गुरूवार, दिनांक २३ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक ७]**

(७) **श्री.प्रसाद लाड,** ॲड. निरंजन डावखरे, श्री.रमेश पाटील, **वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"गुरचरण जमिनीवर पिढ्यानपिढ्या वास्तव्यास असणाऱ्या, कब्जेधारक आदिवासी कुटुंबांना वगळण्यात यावे, यासाठी मा.उच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करण्यात यावी जेणेकरुन या आदिवासी भूमीपुत्रांवर अन्याय होणार नाही. गायरान जमिनींवरील अतिक्रमणासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने या याचिकांना दिनांक २८ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत दिलेल्या स्थगितीदरम्यान पालघर जिल्ह्यात अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली गुरचरण जमिनीवरील अतिक्रमणे व बेकायदेशीर बांधकामे तेथील तहसिलदारांनी पोलीस बंदोबस्तांमध्ये निष्कासित करुन अतिक्रमणाच्या जागा संबंधित ग्रामपंचायतीच्या ताब्यात देण्यासाठी सूचित करण्यात आले असतानाही शासनाची भूमिका स्पष्ट झालेली दिसून येत नाही, पालघर जिल्ह्यात निष्कासित केलेल्या तारापूर मंडळ अधिकारी क्षेत्रातील केळवा रोड परिसरातील तसेच कुंभोवली येथील गुरचरण जमिनीवरील अतिक्रमणे

अप्रकाशित प्रत

नागरिकांनी निष्कासित केली असूनही तेथील दोन हेक्टर जागा ईएसआयसी रुग्णालयाच्या उभारणीकरिता हस्तांतरित करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव तयार केला असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून प्राप्त झाली आहे सबब, सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यात येऊन याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**(क) अल्प सूचना प्रश्न**

**"बृहन्मुंबई महानगरपालिकेतील वैद्यकीय महाविद्यालयातील अधिष्ठाता व अध्यापकांचे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती वय वाढविण्याबाबत घेतलेला निर्णय रद्द करण्याबाबत" या विषयावरील श्री. सुनिल शिंदे, वि.प.स. यांचा अल्पसूचना प्रश्न क्रमांक १८७७६**

**(ख) तारांकित प्रश्न**

**(ग) तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**वने मंत्री** : दिनांक २३ मार्च, २०२३ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील **सर्वश्री. अब्दुल्लाखान दुर्राणी, शशिकांत शिंदे व अमोल मिटकरी, वि.प.स.** यांचा "**मराठवाड्यातील वृक्ष लागवड योजनेची चौकशी करण्याबाबत**" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक १७२०० ला दिलेल्या उत्तरातील आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**(घ) अतारांकित प्रश्नोत्तरांची बारावी ते पंधरावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

अग्रिम प्रत

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**(१) मुख्यमंत्री** : "राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री** : **(क)** "लिंगभाव अर्थसंकल्प विवरणपत्र (Gender Budget Statement) व बाल अर्थसंकल्प विवरणपत्र (Child Budget Statement) २०२३-२०२४ हे प्रकाशन" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचे सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षांचे प्रशासन अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(३) खनिकर्म मंत्री** : "महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

**(मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३ व गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेचे निवेदन) — [अनुक्रमांक (१)] —**

(१) **श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक ३२** वर **महसूल मंत्री** निवेदन करतील :-

गायरान जमिनीवरील अतिक्रमण काढण्यासंदर्भात शासनाने बजावलेल्या नोटीसबाबत.

(२) **श्री.अभिजीत वंजारी, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक ५०** वर **मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

शासकीय, निमशासकीय स्तरावर दिव्यांगाना मिळणारे आरक्षण पुरेसे नसल्याबाबत.

(३) **श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक ५१** वर **ग्रामविकास मंत्री** निवेदन करतील :-

राज्यातील जिल्हा परिषदेतील शाळांना शिक्षकांच्या पगारासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

(४) **श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक ४८** वर **उद्योग मंत्री** निवेदन करतील :-

सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यामध्ये पुसेगांव निडळ येथे एमआयडीसीची स्थापना करण्याबाबत.

(५) **श्री.सचिन अहिर, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक ४५** वर **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** निवेदन करतील :-

पालघर जिल्हयातील संजय नगर बोईसर येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाच्या नवीन इमारतीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

(६) **श्री.अमोल मिटकरी, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक ४९** वर **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** निवेदन करतील :-

गोवंडी येथील रहिवाशी कामा रुग्णालय, मुंबई येथे उपचाराकरिता दाखल असताना झालेल्या मृत्यूबाबत.

(७) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक ३९** वर **शालेय शिक्षण मंत्री** निवेदन करतील :-

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शालेय पोषण आहार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या खिचडीसाठी धान्य पुरवठा करण्याबाबत.

अग्रिम प्रत

(८) **श्री.जयंत पाटील, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना **क्रमांक ४७** वर **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** निवेदन करतील :-

रायगड जिल्हयातील अलिबाग, मुरुड, रोहा, पोलादपूर, खालापूर या तालुक्यातील तांडावस्ती व समुहाला पायाभूत सोयी सुविधांपासून वंचित रहावे लागत असल्याबाबत.

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३ व गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१)] —**

(१) **श्री.एकनाथराव खडसे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील विविध प्रकल्पांसाठी शासनाने हजारो शेतकऱ्यांच्या लाखो हेक्टर जमिनी संपादित करणे, प्रकल्पासाठी शेतजमीन संपादन झाल्याने शेतकऱ्यांसमोर निर्माण झालेला रोजगाराचा प्रश्न, सदर प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना नोकरभरतीमध्ये दिलेले ५ टक्के आरक्षण, २००९ पूर्वी सदर प्रकल्पग्रस्त बेरोजगारांना सरळसेवा भरतीने जेष्ठता क्रमाने व शैक्षणिक पात्रतेनुसार भरती करणे, मात्र दिनांक २७ ऑक्टोबर, २००९ च्या शासन निर्णयाद्वारे सदर पदभरती ही जाहिरात देऊन सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवाराची पात्रता तपासून व स्पर्धा परिक्षेद्वारे करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, प्रकल्पासाठी शेती, घरे संपादित झाल्याने बेघर, निर्धन झालेल्या शेतकऱ्यांच्या पाल्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, राज्य शासनाकडून अनुकंपा, नोकरभरतीच्या धर्तीवर सरळसेवा पध्दतीने प्रकल्पग्रस्तांच्या ठेवलेल्या जेष्ठता यादीनुसार स्पर्धात्मक परिक्षेशिवाय प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्तांना सेवेत सामावून घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

**(गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (२)] —**

(२) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई उपनगरातील कांदिवली, ता.बोरीवली येथील क्लस्टर डेव्हलपमेंट योजनेच्या प्रस्तावाबाबत एल्टी गीजे सी.एच.एस कडून दिनांक ०५/१२/२०२२ आणि दिनांक ०१/०२/२०२३ रोजी प्राप्त झालेल्या पत्रानुसार आणि दिनांक ०५/१२/२०२२ रोजी महापालिका आयुक्तांना उद्देशून लिहिलेल्या पत्रानुसार सोसायटी किंवा जि.बी.आर. (जनरल बॉडी रिझोल्यूशन) यांच्या संमती आणि पुष्टीशिवाय सितारा बिल्डर्स प्रायव्हेट लिमिटेडने दिनांक २१ डिसेंबर २०२२ रोजी क्लस्टर डेव्हलपमेंट स्कीम सादर केली असणे, ज्यात एल्टी गीजे सी.एच.एस. समाविष्ट असणे, सोसायटीने दिनांक २४ नोव्हेंबर २०२२ रोजी उपमुख्य अभियंता इमारत प्रस्ताव (आर-सेंट्रल) डब्ल्यू.एस. II कडे चुकीच्या पद्धतीने सादर केल्याबद्दल आक्षेप घेतला असणे, सोसायटीचा लेखी आक्षेप असूनही डीवायसीई डब्ल्यू.एस. II- आर-सेंट्रल ने सीडीएस प्रस्ताव एम.सी.जी.एम. आयुक्तांकडे पाठवला असणे, उच्चाधिकार समितीने आपल्या दिनांक ११/०१/२०२३ च्या बैठकीत हा प्रस्ताव मान्य करून, सोसायटीच्या आक्षेपानंतरही प्रस्ताव नगरविकास विभागाकडे पाठविला असणे, एल्टी गीजे सी.एच.एस सोसायटीमध्ये १७२ सदस्य असून मेसर्स सितारा बिल्डर्स प्रायव्हेट लिमिटेडने माहे मे, २०२२ मध्ये लबाडीने आणि चुकीच्या हेतूने ३८ सभासदांकडून परस्पर संमती मिळवून त्यांना कोणत्याही अधिकाराशिवाय आणि सोसायटीच्या जनरल बॉडी ठरावा शिवाय पाठिंबा दिलेला असणे, (३८ सभासदांपैकी ६ सदस्यांनी त्यांची संमती काढून घेतली असणे) संमतीचे उघड निरीक्षण केल्यावर हे स्पष्टपणे उघड होते की एस.जी.एम. किंवा इतिवृत्तांचे तपशील हेतुपुरस्सर रिक्त सोडले गेले असणे, कारण अशी कोणतीही मिनिटे/ठराव मेसर्स सितारा बिल्डर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या बाजूने वैयक्तिक संमतीच्या अंमलबजावणीसाठी मंजूर केलेला नसणे, सदस्यांची किमान ५१% संमती मिळवल्याशिवाय, डेप्युटी सी.एच.ई. (बी.पी.) डब्ल्यू.एस. II सी.डी.एस. मध्ये असा प्रस्ताव कसा स्वीकारू शकत नाही, तरीही सदरील प्रस्ताव उच्चाअधिकार समितीमध्ये मंजूर केला असणे, सदरील इमारत ही जिर्ण अवस्थेत असल्याने या क्लस्टर डेव्हलपमेंटचा प्रस्ताव तात्काळ थांबविण्यात येऊन मेसर्स सितारा बिल्डर्स प्रायव्हेट लिमिटेडने सादर

अग्रिम प्रत

केलेल्या त्यांच्या या प्रस्तावातून एल्टी गीजे सी.एच.एस. ला काढून टाकण्याबाबत तसेच कांदिवली, ता.बोरिवली येथील सी.टी.एस. क्रमांक ४/१० (पी.टी.) असलेल्या भूखंडाचा समावेश करण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया."

(३) **ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नवी मुंबई प्रकल्पासाठी राज्य शासनाने नियोजन प्राधिकरण म्हणून सिडको महामंडळाची स्थापना करणे, नवी मुंबई प्रकल्पाच्या विकासाबरोबरच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प, नवी मुंबई मेट्रो, नैना प्रकल्पांसारख्या महत्वाच्या प्रकल्पांच्या अंमलबजावणी व संनियंत्रणाची जबाबदारी सिडकोवर सोपविण्यात येणे, सद्य:स्थितीत नवी मुंबईच्या कार्यक्षेत्रामध्ये नवी मुंबई महानगरपालिका व पनवेल महानगरपालिकांची स्थापना झाल्यानंतरही काही नोडसाठी सिडको हे नियोजन प्राधिकरण असणे, नवी मुंबईतील जमीन सिडको महामंडळाने भाडेपट्ट्याने वाटप केलेल्या जमिनीच्या विकासकांशी विविध बाबींवर चर्चा करुन बांधकाम व्यवसायांशी संबंधित अडचणींबाबत निर्णय घेण्यासाठी शासनाने माहे ऑक्टोंबर, २०२२ मध्ये समिती गठित करणे, उक्त समितीने १२.५ टक्के योजनेंतर्गत वाटप केलेल्या भूखंडावर येणारी मोठ्या प्रमाणातील मावेजा रक्कम व त्यानुषंगाने बांधकाम मुदतवाढीसाठी वाढणारे अतिरिक्त भाडेपट्टा शुल्काबाबत, अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क (ALP) आकारणीसाठी ११५ टक्के पर्यंतच्या दराबाबत, बांधकाम पूर्णत्वाचा दाखला वास्तुविशारद यांनी प्रमाणित केल्यानंतर अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क (ALP) आकारण्याबाबत निर्णय घेऊन समितीने तीन महिन्यात शासनास अहवाल करणे शासन निर्णयामध्ये नमूद असतांना देखील अद्याप समितीने अहवाल शासनास सादर न करणे, रेडीरेकनर दरानुसार टेंडर प्लॉट मूळ रक्कमेच्या तीन ते चार पट अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क आकारण्यात येत असणे, २०१७ पर्यंत सिडको व विकासकांमध्ये होणाऱ्या करारनाम्यानुसार अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क ४० टक्के (ALP) आकारण्यात येत असणे, परंतु सन २०१७ नंतर त्यामध्ये ११५ टक्के पर्यंत वाढ करणे, सद्य:स्थितीत लागू करण्यात आलेल्या धोरणानुसार मूळ भूखंडाच्या किंमतीच्या अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क (ALP) १२ वर्षापर्यंतच्या कालावधीपर्यंतचे मुल्य ६२५ टक्के होत असल्याने ही बाब आर्थिकदृष्टीने

अव्यवहार्य असणे, त्यामुळे भोगवटा प्रमाणपत्र (OC) मिळणेस विलंब होत असल्याने विकासक आणि सदनिकाधारकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असणे, सिडको आकारत असलेले अतिरिक्त भाडे शुल्क भूखंडाच्या मूळ किंमतीपेक्षा जास्त वाजवी दराने न आकारता सवलतीच्या दराने आकारण्यात यावा अशी होत असलेली मागणी, अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क (ALP) चे धोरण सिडको क्षेत्राव्यतिरिक्त इतर कुठेही नसणे, विकासक व सदनिका धारकांना दिलासा देण्याकरिता वर नमूद बाबींबाबत सर्वसमावेशक धोरण जाहिर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई शहरातील शेकडो कबुतर खाने विना परवानगीने सुरु असल्याची बाब माहे मार्च, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास येणे, या कबूतरखान्यांची रितसर परवानगी महापालिकेकडून घेणे आवश्यकता असतानाही विना परवाना हे कबूतर खाने सर्रास सुरु असणे, मुंबई शहरातील काही कबूतर खान्याला हेरिटेज दर्जा प्राप्त असून हे कबूतर खाने पाहण्यासाठी देश विदेशातून अनेक पर्यटक येत असतानाही याची नोंद महापालिकेकडे नसणे म्हणजे आश्चर्य व्यक्त होत असणे, कबूतरांना उघडल्यावर खाद्य पदार्थ टाकल्यास राज्यातील इतर महानगरपालिका दंड आकारत असतानाही मुंबई महापालिकेचे याकडे कोणतेही लक्ष नसणे, त्यातच मुंबईतील लाखो नागरिकांना श्वसनाच्या आजाराचा सामना करावा लागतो त्यासाठी कबूतराच्या अतिवावर असलेल्या परिसरातील नागरिकांचा त्यात समावेश असतानाही महापालिका आणि राज्य शासन नागरिकांना श्वसन विकाराचा त्रास होऊ नये यासाठी कोणतीच उपाययोजना करीत नसणे, त्यासाठी राज्य शासन आणि मनपाने संयुक्त मोहीम राबवून या कबूतर खान्यांना रितसर परवानगी द्यावी आणि त्यांच्यापासून श्वसन विकार व इतर आजार होणार नाही याची दखल मुंबईतील नागरिक घेत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्री.सचिन अहिर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील धर्मादाय संघटनेतील सहाय्यक धर्मादाय आयुक्त या पदावरील एका अधिकाऱ्याची धर्मादाय उप आयुक्त, जळगांव येथे रिक्त

अग्रिम प्रत

पदावर माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये पदोन्नती झालेली असणे, धर्मादाय संघटनेमध्ये सध्या मुंबई, ठाणे व सोलापूर या ठिकाणी प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेल्या तीन न्यायिक अधिकारी/न्यायाधीश यांची सेवा उच्च न्यायालयास प्रत्यावर्तीत न झाल्याने पदोन्नती करिता पात्र असणाऱ्या नियमित अधिकाऱ्यांना धर्मादाय उप आयुक्त या पदावर पदोन्नती मिळण्यास प्रचंड विलंब होत असणे, सदरील तीन न्यायिक अधिकाऱ्यांची/न्यायाधिशांची सेवा उच्च न्यायालयास प्रत्यावर्तीत करणेकामी विधी व न्याय विभागाने कार्यवाही करणे अपेक्षित असतांनाही त्याबाबत कोणतीच कार्यवाही न होणे, तसेच या तीन न्यायिक अधिकाऱ्यांची/न्यायाधिशांची सेवा उच्च न्यायालयास प्रत्यावर्तीत करुन घेणेकामी महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडून विधी व न्याय विभागाच्या पत्रव्यवहारास कोणताही प्रतिसाद दिला जात नसणे, त्यामुळे शासनाने याप्रकरणाची चौकशी करुन सदरील अधिकारी यांना पदोन्नतीसाठी निर्देश देणे आवश्यक असतानाही त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी या संघटनेतील अधिकारी वर्गामध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व तीव्र नैराश्याची भावना, शासनाने याप्रकरणाची चौकशी करुन व न्यायिक अधिकारी यांची प्रतिनियुक्ती तात्काळ रद्द करुन शासन सेवेतील अधिकाऱ्यांना तातडीने पदोन्नती देणेबाबत करावयाची कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडून (एमडब्ल्यूआरआरए) राज्यात घरगुती आणि औद्योगिक पाणीपट्टीत केलेली वाढ १ जुलैपासून लागू करण्यात आली असणे, त्यानुसार कच्च्या मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना प्रति हजार लिटरला ३३० रुपये मोजावे लागणार असणे, डिस्टलरी कडील अल्कोहल व इथेनॉल उत्पादनाकरिता होणारा पाणीवापर हा कच्चा माल गृहीत धरुन सुधारित दराने पाणी बिलाची आकारणी होणार असणे, सन २०१८ च्या शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे पाण्याचा कच्चा माल म्हणून वापर होणाऱ्या उद्योगात शितपेये, आसवानी (ब्रुअरिज) मिनरल वॉटर किंवा तत्सम उद्योग यांचा समावेश असल्याने डिस्टलरी करिता रेग्युलर दराने पाणी पट्टी आकारण्यात येत असणे, पण शासनाच्या सन २०२२ च्या परिपत्रकामध्ये बाटलीबंद पिण्याचे पाणी, शितपेये, स्पिरीट, अल्कोहोल, इथेनॉल, ब्रुअरिज, आसवानींना (डिस्टलरीज) व तत्सम उद्योगांचा पाण्याचा कच्चा माल म्हणून

अस्वाक्षरित प्रत

वापर होणाऱ्या उद्योगात समावेश केलेला असणे, त्यामुळे डिस्टलरी करिता प्रति हजार लिटरमागे ११.५२ रु. वरुन ३३० रु. दरवाढ झालेली असणे, सदरची दरवाढ डिस्टलरी उद्योगास परवडणारी नसल्याने त्याचा डिस्टलरी उद्योगावर विपरित परिणाम होऊन उत्पादन निर्मितीला फटका बसणे, त्यामुळे डिस्टलरी उद्योगात पाणीवापर हा थेट कच्च्या मालासाठी होत नसून तो प्रक्रियेसाठी होत असल्याने म्हणजेच औद्योगिक कारणासाठी होत असल्याने डिस्टलरी युनिटसाठी औद्योगिक पाणीवापर दरानुसार पाणीपट्टी आकारण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

(७) **श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नागपूर-रत्नागिरी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६६ या मार्गावरील रत्नागिरी-कोल्हापूर विभागातील रस्त्याचे विस्तारीकरण, चौपदरीकरण या कामासाठी भूसंपादनाचे काम विशेष भूसंपादन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांच्यामार्फत सुरू असून कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले, करवीर, पन्हाळा व शाहूवाडी या चार तालुक्यातील ४९ गावातील शेतकऱ्यांचे भूसंपादन होत आहे, यामध्ये काही गावे कोल्हापूर नागरी क्षेत्र प्राधिकरण मध्ये समाविष्ट असून सदर गावांची अंतिम निवड करीत असताना ही गावे नागरी क्षेत्र प्राधिकरणामध्ये समाविष्ट असल्याने येथील जमिनीचे भाव शहरी रेडीरेकनर प्रमाणे देणे आवश्यक असताना ग्रामीण रेडीरेकनरप्रमाणे दर दिले जात असल्याने त्या ठिकाणच्या शेतकऱ्यांमध्ये व प्रकल्प बाधितांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने चौकशी करून सदर प्राधिकरणाअंतर्गत गावातील भूसंपादन करण्यात येणाऱ्या प्रकल्पबाधितांना शहरातील रेडीरेकनरच्या चौपट दराने किंवा प्रस्तावित हायवे समुख क्षेत्रातील अधिकृत बिनशेती झालेल्या जमिनीच्या चौपट दराने जमिनीचे मूल्यांकन करून देण्याबाबत करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(८) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"जयपूर (ता.जि.छत्रपती संभाजीनगर) येथील शेतकऱ्यांच्या जमिनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहती करिता सन २०१७-२०१८ साली संपादित केल्या असणे, शेतकऱ्यांच्या संपादित केलेल्या

अप्रकाशित प्रत

जमिनीचा मोबदला काही ठराविक लोकांना मिळाला असून संपादित जमिनीमधील फळझाडे, विहिरी व घरे यांचे मुल्यमापन करण्याचे कामही अद्याप प्रलंबित असणे, तसेच शेतकऱ्यांना नवीन जमीन खरेदी करण्यासाठी इसार पावती करण्यात आल्या असूनही मोबदल्याची रक्कम मिळाली नसल्याने दुसऱ्या गावात जमीन घेता येत नसणे, उक्त प्रकरणी नागरीकांनी छत्रपती संभाजीनगर येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी, प्रादेशिक अधिकारी व मुख्य अभियंता याकडे पाठपुरावा करुनही अद्याप मोबदला मिळालेला नसल्याने नागरीकांच्या मनात शासनाच्या धोरणाबाबत निर्माण झालेली संभ्रमावस्था, त्यामुळे उक्त प्रकरणी चौकशी करुन सदरहू शेतकऱ्यांना तात्काळ संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(९) **श्री.रामराजे नाईक-निंबाळकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉरच्या धर्तीवर बँगलोर-मुंबई आर्थिक कॉरिडॉर (BMEC) अंतर्गत सातारा जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या औद्योगिक वसाहती विकसित करण्याचा राज्य शासनाचा मानस असणे, त्यानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत (MIDC) भूसंपादन कार्यवाही सुरु होणे, राष्ट्रीय औद्योगिक कॉरिडॉर विकास कार्यक्रम (NICDC) अंतर्गत केंद्र शासनाच्या समितीने तांत्रिकदृष्टया सातारा जिल्हयातील उत्तर कोरेगाव मधील जागा पात्र ठरलेली असणे, उत्तर कोरेगाव भाग राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ पासून ४ किमी अंतरावर पुणे-कोल्हापूर रेल्वे महामार्गापासून ६ किमी अंतरावर पुरंदरचा प्रस्तावित विमानतळ व लॉजिस्टीक पार्क ५० किमी अंतरावर त्याचप्रमाणे पुणे-बँगलोर ग्रीन-फिल्ड हायवे पासून ५ ते १० किमी अंतरावर असणे, उत्तर कोरेगाव भागात वीज व पाण्याची सहज असलेली उपलब्धता, त्याचप्रमाणे पुणे-मुंबई या मेट्रोसिटी पासून अगदी जवळ असल्याने ट्रान्सपोर्ट व्यवस्था तसेच कुशल व अकुशल कामगारांची उपलब्धता असणे, उत्तर कोरेगाव मधील शासनाने निवडलेली सोळशी, नायगाव, रणंदुल्लाबाद, नांदवळ, पिंपोडे, भावेनगर व तडवळे या सर्व गावातील ७० टक्के पेक्षा जास्त शेतकरी औद्योगिक वसाहतीसाठी जमीन देण्यासाठी तयार असणे, या प्रकल्पासाठी एकूण १२,२३८ एकर जागा लागणार असणे, त्यापैकी पहिल्या टप्प्यात ८,००० एकर जागा उत्तर कोरेगाव मधील शेतकरी या प्रकल्पासाठी जमीन द्यायची तयारी दर्शविणे, उत्तर कोरेगाव मधील लॉजिस्टीक किंमत देशाच्या सरासरी लॉजिस्टीकच्या किंमतीपेक्षा १३ टक्के पेक्षा कमी असल्याने उत्पादन खर्चात घट होणार असणे, या प्रकल्पामध्ये GDP

अप्रकाशित प्रत

मध्ये वाढ होण्यास मदत होणार असणे, बँगलोर-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉरसाठी कोरेगाव येथील जागा निवडीबाबत माहे जुलै, २०२२ मध्ये केंद्रीय अर्थमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समितीच्या दिल्ली येथील ऑनलाईन बैठकीत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांनी उत्तर कोरेगाव या भागासाठी सहमती दर्शविणे, असे असतांना या प्रकल्पाचे काम पुढे नेण्यास उशीर झालेला असणे, त्यामुळे उत्तर कोरेगाव मधील जनतेत शासनाप्रती पसरलेली तीव्र नाराजी आणि संतापाची भावना, हा प्रकल्प सुरु व्हावा यासाठी शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

(१०) **सर्वश्री शशिकांत शिंदे,** विक्रम काळे, अमोल मिटकरी, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या राज्यात ९७६ आश्रमशाळा कार्यान्वित असून वारंवार उच्च न्यायालयाचे आदेश होऊनही व दिनांक २८ फेब्रुवारी, २०१७ च्या विधी व न्याय विभागाच्या परिपत्रकाप्रमाणे एकाला दिलेला न्याय त्याच संवर्गातील इतरांना लागू होतो व राज्य घटनेच्या “समान काम समान वेतन” या राज्यघटनेने दिलेल्या अधिकारावर बाधा येत असून इतर अधिक्षकांना लाभ दिला जात असणे, तथापि १५८ वसतिगृह अधिक्षकांना ४२०० ग्रेड पे लाभापासून वंचित ठेवण्यात आल्याचे दिनांक १७ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, तसेच आदिवासी विकास व इतर मागास बहुजन कल्याण आश्रमशाळा ध्येय धोरण व अधिक्षकांचे कामाचे स्वरुप एकच असतांना आदिवासी विभागातील अधिक्षकांना सर्व लाभ मिळत असणे, मात्र इतर मागास बहुजन कल्याण विभागातील अधिक्षकांना ते मिळत नसणे, त्यामुळे संबंधित १५८ वसतिगृह अधिक्षकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, संबंधित अधिक्षकांना ४२०० ग्रेड पे मंजूर करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**पाच : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

## - मध्यंतर -

**सहा : शासकीय विधेयके —**

(क) **विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार पुढे सुरु, खंडश: विचार व संमत करणे.**

अग्रिम प्रत

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(१)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० — महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, २०२३"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, एकनाथराव खडसे, सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, अभिजीत वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० — महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, २०२३" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(२)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ — महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२३"

**(ग) विधानसभेने संमत केल्यास — विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(१)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३"

**(२)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ — महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२३"

**(३)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७ – महाराष्ट्र गोसेवा आयोग विधेयक, २०२३"

**(४)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ – महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (सुधारणा) विधेयक, २०२३"

---

**सात** : **(गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव)** – **सर्वश्री अंबादास दानवे**, सतेज उर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, सचिन अहिर, अशोक ऊर्फ भाई जगताप, शशिकांत शिंदे, ॲड.अनिल परब, सर्वश्री अभिजीत वंजारी, विक्रम काळे, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री राजेश राठोड, अनिकेत तटकरे, जयंत पाटील, नरेंद्र दराडे, डॉ.वजाहत मिर्झा, सर्वश्री सतीश चव्हाण, विलास पोतनीस, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री अमोल मिटकरी, आमश्या पाडवी, जयंत आसगावकर, अरुण लाड, सुनिल शिंदे, धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव** –

"राज्याची ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, मोठ्या शहरात संघटीत गुन्हेगारीत झालेली वाढ, वाळूमाफिया, मुरुममाफियांची वाढलेली दादागिरी, गँगस्टरशी संबंध असलेल्या ठाणे महानगरपालिकेतील सहाय्यक आयुक्तावर पोलीस कारवाई करण्यात अक्षम्य दिरंगाई झाली असणे, खंडणी टोळ्या सक्रीय झाल्याने उद्योजक, व्यावसायिकांमध्ये पसरलेले भीतीचे वातावरण, छत्रपती संभाजीनगरमध्ये कोयता गँगची पसरलेली दहशत, जनतेतून तीव्र विरोध होत असल्याने आंतरधर्मीय समिती बरखास्त करण्याची आवश्यकता, आंतरधर्मीय कुटुंबात घरगुती हिंसाचाराला वेगळे स्वरुप दिले जात असल्याने सामाजिक अशांतता निर्माण झाली असणे, नामांतर वादातून समाज भावना भडकावण्याचा होत असलेला प्रयत्न, पोलिसांवर पडणारा ताण, पोलिसांच्या घरांचा प्रलंबित प्रश्न, पोलीस दलातील बढत्या, बदल्या रखडल्याने पोलीस दलात पसरलेला असंतोष, राज्यात लोकप्रतिनिधी व खाजगी व्यक्तींकडून झालेला गोळीबार, राजकीय कार्यकर्ते, लोकप्रतिनिधींवर होणारे हल्ले व सुडबुध्दीने होणारी कारवाई, राज्यात संचार आणि विचार स्वातंत्र्याचा होत असलेला संकोच, पत्रकारांची झालेली हत्या, लव्हजिहाद, अपहरण, दरोडे, सायबर गुन्हे, घरफोड्या यासारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यात आलेले अपयश, अंमली पदार्थ, गुटखा व्यापार, जुगार, मटका या अवैध धंद्यात झालेली अपरिमित वाढ, अल्पवयीन मुले, मुली व महिलांवरील अत्याचाराच्या

घटनांमध्ये झालेली वाढ, शक्ती कायद्याची रखडलेली अंमलबजावणी, हरवलेल्या महिलांचा शोध घेण्यात आलेले अपयश, बालविवाहाला प्रतिबंध घालण्यात सरकारला येत असलेले अपयश, सरकारने कॉपीमुक्त अभियानाची घोषणा केली असली तरी दहावी व बारावी परिक्षेत मोठ्याप्रमाणावर कॉपी व प्रश्नपत्रिका फोडण्याचे झालेले प्रकार, अवैध सावकारीला प्रतिबंध घालण्यात सरकारला आलेले अपयश, राज्याच्या विविध विभागात भ्रष्टाचार व अनियमिततांची प्रकरणे उघडकीस येऊनही सरकार चौकशी करण्याबाबत सकारात्मक नसणे, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्गाच्या कामात हजारो कोटी रुपयांच्या उघडकीस आलेल्या गौण खनिज घोटाळ्याची चौकशी करण्याची आवश्यकता, मदत व पुनर्वसन विभागात आपत्कालीन कामाच्या नावाखाली झालेला ७७०० कोटींच्या कामाचा घोटाळा, जळगावातील कुबेर ऑनलाईन, मटका रॅकेट, आदिवासी विकास विभागातील भ्रष्टाचारी उपायुक्त व अतिरिक्त आयुक्तांना सेवेत घेऊन कार्यकारी पदावर केलेली नेमणूक, महाज्योती, बार्टी, सारथी व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्या ढिसाळ कारभारामुळे बेरोजगार वर्ग निराश होणे, तसेच सध्या साथीच्या रोगात वाढ झाली असून त्यात अजून नवीन साथीच्या रोगाची भर पडणे, H३ N२ या रोगात वाढ होत असताना करोनानंतर डोसमुळे हृदय विकार, श्वसनाचे विकार व इतर शारिरीक व्याधी मध्ये वाढ होणे, त्याची सरकारने घ्यायची गांभीर्याने दखल, वेगवेगळ्या योजनेतून मोफत आरोग्य सेवा, शस्त्रक्रिया, औषधे याची सरकारने जाहिरात करणे, परंतु प्रत्यक्षात लाभ न मिळणे, मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये निकषात न बसलेले प्रस्ताव मंजूर केल्यामुळे निधीची कमतरता त्यामुळे पात्र गरीब जनतेवर होत असलेला अन्याय, रुग्णालयातून मानवी अवयव तस्करीचे होत असलेले गुन्ह्या प्रकरणी आवश्यक असलेल्या गरीबांना न्याय न मिळणे, असाध्य रोगासाठी रुग्णांना टाटासारख्या रुग्णालयावर अवलंबून न राहता तशाच प्रकारची विभागीय रुग्णालये सुरु करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

अग्रिम प्रत

आठ : (क) **(मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३, बुधवार, दिनांक १५ मार्च, २०२३, गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३, शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०२३, सोमवार, दिनांक २० मार्च, २०२३, मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३ व गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रसाद लाड, ॲड.निरंजन

डावखरे, सर्वश्री रमेशदादा पाटील, श्रीकांत भारतीय, राजहंस सिंह, विप्लव बाजोरीया, प्रा.राम शिंदे, सर्वश्री महादेव जानकर, प्रविण दटके, श्रीमती उमा खापरे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव – (मंत्र्यांचे उत्तर) –**

"माहे जुलै, २०२२ नंतर मुंबई शहराच्या विकासाची नियोजनात्मक व कालबद्ध कामे हाती घेण्यात आली असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर असून या शहराच्या नावलौकीकाला साजेसे असे ५०० पेक्षा अधिक सुशोभिकरणाचे प्रकल्प मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री महोदयांच्या नाविन्यमय कल्पकतेतून सुरु असणे, गेल्या अनेक वर्षापासून मुंबई शहराला एसटीपी पासून दूर ठेवण्यात आले असताना मागील तीन महिन्यांमध्ये मुंबई शहरात ७ ठिकाणी एसटीपीच्या प्रकल्पांचे भूमिपूजन होऊन काम सुरु झाल्याचे निदर्शनास येणे, मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते अशा प्रकारचे चित्र दिसत असून खड्डे बुजविणे व डांबरीकरणाकरिता मागील २५ वर्षात २१ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम खर्च करण्यात येऊनही मुंबई शहराच्या रस्त्यांची प्रचंड दुरवस्था झाली असल्याने मुंबईकरांच्या मनामध्ये निर्माण झालेली उद्विग्नता, मागील ६ महिन्यांमध्ये विद्यमान शासनाने महानगरपालिकेला आदेश दिल्यानंतर मुंबई शहराच्या ४५० कि.मी.च्या रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणाची ६ हजार कोटींपेक्षा जास्त रक्कमेची निविदा काढण्यात येऊन त्यासंदर्भातील वर्कऑर्डर्स निघाल्यानंतर संबंधित कामांचे भुमिपूजन पंतप्रधानांच्या हस्ते झाले असणे, मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर सन २०१४ ते २०१९ या कालावधीमध्ये सुमारे ३०० कि.मी.च्या मेट्रोचे काम सुरु होऊन मध्येच खोळंबल्याची बाब निदर्शनास येणे, आरे कारशेडच्या मुद्यामुळे मुंबईच्या मेट्रोच्या कामात विलंब झाल्याने मेट्रो कारशेडच्या खर्चात १० हजार कोटी पेक्षा अधिक वाढ झाल्याचे आढळून येणे व परिणामी मेट्रोचे अपेक्षित ध्येय अद्यापही गाठता न येणे, मेट्रो २-ए आणि २-बी ची सेवा सुरु झाल्याने पश्चिम द्रुतगती मार्गावरील अंधेरी आणि दहिसरच्या मध्ये वाहतुक कोंडी कमी होऊन मुंबईकरांचा प्रवास सुकर झाल्याचे निदर्शनास येणे, विद्यमान शासनाने मेट्रो प्रकल्पांचे काम जलद गतीने सुरु केल्याने व सन २०२४ ते २०२६ या कालावधीत मेट्रो तसेच कोस्टल रोड प्रकल्प पूर्ण होण्याचे स्वप्न दृष्टीपथास आल्याने मुंबईकरांचे जीवनमान उंचावले असून मुंबईची तकदीर व तसबीर बदलली असल्याची बाब दिसून

अप्रकाशित

येणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सिमांकन करुन वेगळी विकास नियंत्रण नियमावली तयार करण्याची प्रक्रिया अद्यापही प्रलंबित राहिल्याने मुंबईतील कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरवस्था तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, मुंबईतील व रेल्वे स्थानकांच्या दोन्ही बाजूकडील झोपडीधारकांच्या पात्रता निश्चितीसाठी एक खिडकी व कालबद्ध स्थलांतरण योजना तयार करण्याची आवश्यकता, मुंबईतील उपकर प्राप्त जुन्या व मोडकळीस आलेल्या खाजगी इमारतींचा पुनर्विकास करण्याचे, तसेच एसआरए प्रकल्पबाधितांच्या न्यायप्रविष्ट प्रकरणांच्या संदर्भातील शासनाचे धोरण, मुंबई शहरात दिड लाख फेरीवाले पात्रताधारक असूनही त्यांना जागेचे वाटप करण्यात न आल्याने पदपथांवर ते व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास येणे, त्यांच्याकरिता मार्केट झोन निर्माण करण्याची आवश्यकता जेणेकरुन, पदपथ मोकळे होऊन वाहतुक कोंडी होणार नाही, मागील २५ वर्षात मुंबई महानगरपलिकेच्या स्थायी समितीमार्फत किमान ३ लाख कोटींपेक्षा जास्त कामाच्या निविदा मंजूर होऊन त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, कोविडच्या काळात वैद्यकीय साहित्य खरेदी-विक्रीच्या विभागात हजारो कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची बाब निदर्शनास येणे, टॅब खरेदी, सफाई कामगार वसाहत पुनर्विकासाच्या आश्रय योजनेमध्ये १८०० कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिकेंतर्गत मागील शासनाच्या काळात जिजामाता उद्यान प्राणी संग्रहालयांच्या आधुनिकीकरणाचा प्रकल्प, ९०० इलेक्ट्रीक बसेसची खरेदी यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, मुंबई व उपनगरात रिक्षा व खाजगी वाहनांचे पार्किंगकरिता बहूमजली वाहनतळे उभी करण्याची आवश्यकता, देशातील प्रदुषणग्रस्त शहरामध्ये मुंबईचा अग्रक्रम असल्याचे निदर्शनास आल्याने शहरातील नालेसफाई करण्याकरिता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची व मुंबई आणि उपनगरातील कचऱ्याची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावण्याची योजना कार्यान्वित करण्याची आवश्यकता, मुंबईत गोवंडीतील डंम्पिंग ग्राऊंड आणि जैववैद्यकिय कचऱ्यावरील प्रक्रिया प्रकल्पांमुळे गोवंडी, शिवाजीनगर, देवनार परिसरात मागील १० वर्षांत झालेला अंदाजे १,८७७ जणांचा मृत्यू, प्रदूषणामुळे मुंबईतील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर होत असलेली क्षयरोगाची बाधा, पर्यावरण संतुलन राखण्यासाठी मोजता येईल अशा पॅरामिटरच्या (कॉन्टीटेटीव्ह गोल्सच्या) आधारावर पर्यावरण धोरण आखून कार्यवाही करण्याची आवश्यकता, मुंबई व उपनगरातील महानगरपालिका, नगरपालिका

अमुद्रित प्रत

क्षेत्रात भरावा लागणारा बिनशेतीकर रद्द करण्याची आवश्यकता, विद्यमान शासनाच्या काळात कायदा व सुव्यवस्थेमध्ये झालेली प्रचंड सुधारणा, त्यामुळे मुंबईकर मोकळा श्वास घेत असल्याची बाब निदर्शनास येणे, कॅगच्या लेखा परिक्षण अहवालातील वस्तुस्थितीदर्शक सत्यता मुंबईकरांपुढे येण्याची आवश्यकता, मुंबईमध्ये डबेवाला भवन व मराठी भाषा भवन तातडीने निर्माण करण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेची मान्यता न घेता जवळपास १९४ अनधिकृत शाळा सुरू असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिकेंतर्गत मराठी शाळांची पटसंख्या दिवसेंदिवस कमी झाल्याची बाब निदर्शनास येत असल्याने मराठी शाळांना आधुनिकतेची व कौशल्य विकास अभ्यासक्रमाची जोड देऊन मराठी विद्यार्थी व पालकांना मराठी भाषेच्या शाळांकडे आकर्षित करण्याची आवश्यकता, मुंबईतील रुग्णालयांमध्ये मुंबईबाहेरून येणाऱ्या रुग्णांची संख्या अधिक असल्याने व अनेकांना अतिदक्षता विभागात ठेवून उपचार करण्याची गरज असल्याने तेवढ्या प्रमाणात व्हेंटीलेटर उपलब्ध नसल्याचे निदर्शनास येणे, मुंबईतील महानगरपालिका व सरकारी रुग्णालयात व्हेंटीलेटरची संख्या वाढविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(ख) **(गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३, शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०२३, सोमवार, दिनांक २० मार्च, २०२३, मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३ व गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव)** –

**सर्वश्री अंबादास दानवे**, सतेज उर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, ॲड.अनिल परब, सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप, शशिकांत शिंदे, जयंत पाटील, नरेंद्र दराडे, अभिजीत वंजारी, विक्रम काळे, विलास पोतनीस, राजेश राठोड, अनिकेत तटकरे, सचिन अहिर, वजाहत मिर्झा, सतीश चव्हाण, सुनिल शिंदे, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री जयंत आसगावकर, अमोल मिटकरी, धीरज लिंगाडे, अरुण लाड, डॉ.मनिषा कायंदे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** –

"राज्याच्या आरोग्य विभागात सुमारे १७ हजार पदे रिक्त असणे, शासकीय रुग्णालयात औषधांचा असणारा तुटवडा, राज्यात एच३एन२ विषाणूचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता, एकूणच आरोग्य व्यवस्थेकडे सरकारचे

अग्रिम प्रत

होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, कट प्रॅक्टिसच्या माध्यमातून रुग्णांचे होणारे शोषण थांबवण्यासाठी कठोर कायदा करण्याची आवश्यकता, राज्यात अवैधपणे सुरु असलेल्या लॅबवर कारवाई करण्याकडे होत असलेले दुर्लक्ष, निवासी डॉक्टरांच्या मागण्यांकडे सरकारचे होत असलेले दुर्लक्ष, तसेच राज्यात शासकीय कर्मचाऱ्यांच्या जुनी पेन्शन योजनेच्या मागणीकडे शासनाने जाणीव पुर्वक दुर्लक्ष करणे, राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांमधील प्रभाग व सदस्य संख्येची फेररचना, प्रभाग रचनेचे अधिकार स्वतःकडे घेण्याचा शासनाचा निर्णय, ९६ नगरपालिकांमध्ये ओबीसी आरक्षण, यासह न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांमुळे निवडणूका दीर्घकाळ प्रलंबित असणे, प्रशासकीय नेमणूकीमुळे जनतेच्या कामावर होत असलेला परिणाम, महानगरपालिका, नगरपालिका व जिल्हापरिषदा यांच्या वर्षानुवर्ष निवडणूका झालेल्या नसल्यामुळे वाढलेला भ्रष्टाचार, एम.एस.आर.डी.सी व एम.एम.आर.डी.ए मध्ये अवास्तव कामाच्या निविदा मंजूर करुन सुरु असलेला भ्रष्टाचार, राज्यातील महानगरपालिकांमध्ये, विशेषतः मुंबई महानगरपालिकेत प्रशासकांकडून प्रकल्प रद्द वा स्थगित केले असणे, दुसऱ्या बाजूला जनप्रतिनिधी नसताना नवीन योजना व प्रकल्पांची घोषणा करुन निधीची उधळपट्टी होत असणे, मुंबईतील रस्त्यांचे काँक्रीटीकरणाचे काम सुरु झाले नसताना कंत्राटदारांना आगाऊ रकमांची वाटण्यात आलेली खिरापत, मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात प्रभागनिहाय निधी वाटपात झालेला भेदभाव, नालेसफाईत होत असलेला विलंब, मेट्रो प्रकल्पग्रस्तांच्या घरवाटपात झालेली अनियमितता, मुंबईतील "बेस्ट" ही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आर्थिक अडचणीत आली असणे, सौंदर्यीकरणाच्या नावाखाली महानगरपालिकेच्या निधीची होत असलेली उधळपट्टी, फिल्म सिटी, गोरेगाव ते शिडीपाडा, मुलुंड या दुहेरी बोगद्याच्या कामासाठी काढलेल्या निविदेत झालेली अनियमितता, मुंबई शहरातील सी-कोस्टल रोडचे काम संस्थ गतीने सुरु असणे, केईएम रुग्णालयात रुग्ण सहायता निधीत गैरव्यवहार झाला असणे, आपला दवाखान्यांमध्ये असलेला ओषधांचा तुटवडा, नादुरुस्त उपकरणे, केईएम व इतर रुग्णालयात सीटीस्कॅन, एमआरआयसारख्या मशीन बंद असणे, गिरणी कामगारांच्या घरांचा प्रलंबित प्रश्न, धारावी पुनर्विकास प्रकल्प व अन्य प्रकल्पांसाठी नेमलेल्या कंत्राटदार कंपनीविरोधातील गंभीर आरोपांमुळे प्रकल्प अडचणीत आले असणे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या प्रधानमंत्री आवास योजनेत झालेला गैरव्यवहार, पनवेल व उरण तालुक्यात नैना

अग्रिम प्रत

प्रकल्पांतर्गत घातलेल्या जाचक अटींना होणारा विरोध, भिवंडी शहरात पंतप्रधान आवास योजनेचे थांबलेले काम, म्हाडाकडे देण्यात आलेले अधिकार शासनाने पुन्हा आपल्याकडे घेतल्याने निर्णयांना विलंब होत असणे, म्हाडा वसाहतीतील गृहनिर्माण संस्थांवर वाढीव सेवा शुल्काचा लादलेला बोजा, झोपु योजनेतील विकासकांकडून थकीत घरभाड्याची तातडीने वसुली करण्याची आवश्यकता, मुंबईतील सेस इमारतींचा रखडलेला पुनर्विकास, राज्यात विजेची प्रचंड होत असलेली मागणी, ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त होण्याच्या घटनेमध्ये झालेली वाढ, वीजे अभावी शेतकऱ्यांच्या पिकांचे होत असलेले नुकसान, शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३ व गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव)** –

**(ग)** **प्रा.राम शिंदे,** सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, विजय उर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री सुरेश धस, निलय नाईक, चंद्रशेखर बावनकुळे, रणजितसिंह मोहिते-पाटील, श्रीकांत भारतीय, विप्लव बाजोरीया, ज्ञानेश्वर म्हात्रे, राजहंस सिंह, प्रविण दटके, गोपिचंद पडळकर, प्रविण पोटे-पाटील, रमेशदादा पाटील, रामराव पाटील, रमेश कराड, वसंत खंडेलवाल, रामदास आंबटकर, महादेव जानकर, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** –

"राज्यातील पुणे व नाशिक ही शहरे व्यापारी केंद्र असल्याने मुंबई, नागपूर, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्राशी जोडलेली असणे, या शहरांचा मुंबईच्या धर्तीवर विकास करण्याकरिता स्वतंत्र विकास आराखडा तयार असणे मात्र, त्यादृष्टीने शासनाकडून विकासात्मक कार्यवाही गतीमान करण्याची आवश्यकता असणे, पुणे शहरात विमानतळाकरिता जागा राखीव असून अन्य पायाभूत सुविधा तातडीने करण्याची आवश्यकता असणे, पीएमआरडीएच्या माध्यमातून रिंगरोड तयार करण्याची आवश्यकता असणे, पुणे महानगरपालिकेतील ३४ गावांचा सीटीसर्व्हे करुन विकास करण्याच्या दृष्टीने नियोजनबद्ध व कालबद्ध आराखडा तयार करण्याची आवश्यकता असणे, पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्याच्या विभाजनाच्या प्रलंबित प्रस्तावावर तातडीने विचार करण्याची आवश्यकता, स्वारगेट ते कात्रज, खडकवासला ते डेक्कन

अप्रकाशित मत

आणि हिंजवडी ते कात्रज मेट्रो रेल्वेच्या कामाला गती देण्याची आवश्यकता, वाढत्या अपघातांना रोखण्यासाठी मुंबई-बेंगलोर महामार्गावरील स्वामी नारायण मंदिर ते नरे जंक्शन उड्डाण पूल करण्याची आवश्यकता, हवेली तालुक्यातील मोठ्या ग्रामपंचायतींचे विभाजन करण्याची आवश्यकता, जुन्या ब्रिटीशकालीन वाड्यांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता असणे, सन २०२७ मध्ये नाशिक शहरात होणाऱ्या कुंभमेळ्याच्या दृष्टीने आवश्यक तयारी आतापासून करण्याची आवश्यकता, नाशिक शहरात पंतप्रधान आवास योजना गतिमान करण्याची आवश्यकता, नाशिक मधील गावठाण भागात असलेली छोटी घरे विकसित करण्याची व नाशिक मधील घरांचा क्लस्टर विकास करण्याची आवश्यकता, परराज्यातून येणारे उद्योग नाशिक शहरात आणण्याचे प्रयत्न करण्याची आवश्यकता, पुणे व नाशिक येथील सहकारी गृहनिर्माण सोसायट्या व गृहनिर्माण मंडळाच्या वसाहतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन पुनर्विकास करण्याची आवश्यकता असून सहकार अधिनियमातील त्रुटी दूर करण्याची आवश्यकता असणे, पुणे व नाशिक येथील वाहतूक समस्या दिवसें-दिवस वाढत असल्याने व प्रवाशांना तासनतास रस्त्यावर खोळंबुन रहावे लागत असल्याने यावर तोडगा काढण्याकरिता वाहतुक समस्येचा अभ्यास करुन वाहतुक आराखडा तयार करण्याची आवश्यकता, पीएमआरडीएच्या माध्यमातून पुणे शहराचे डीपी प्लॅन नव्याने तयार करण्याची आवश्यकता, व कॅन्टोनमेन्ट एरिया पुणे महानगरपालिकेत समाविष्ट करण्याच्या दृष्टीने सुरु असलेली कार्यवाही अधिक गतीमान करण्याची आवश्यकता, पुण्यातील वाढत्या झोपडपट्टीची समस्या सोडविण्यासाठी झोपडपट्टी धोरण व नियमावली करण्याची आवश्यकता, पुणे-नाशिक रेल्वेची सुविधा करण्याकरिता केंद्रीय रेल्वे मंत्रालयाकडे मागणी करुन पाठपुरावा करण्याची आवश्यकता, राज्यात दारु व दुध भेसळीचे प्रकार दिवसें-दिवस वाढत असल्याने संबंधितांवर कठोर कारवाई करण्याच्या दृष्टीने अन्य भेसळ अधिनियमातील शिक्षेची तरतूद कठोर करण्याची आवश्यकता, केंद्राने सहकाराला बळकटी देण्याच्या दृष्टीने केलेल्या प्रयत्नाला राज्य व केंद्र शासनाने परस्पर सामंजस्याने प्रयत्न करण्याची आवश्यकता, राज्यातील बंद पडत असलेल्या सहकारी बँका, कृषी सहकारी संस्था यांना बळकटी देऊन उर्जितावस्थेत आणण्याची आवश्यकता, प्रायमरी अँग्री क्रेडीट सोसायट्या गावपातळीवर काढण्याबाबत केंद्र शासनाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्यात जलदगतीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, राज्यातील बेरोजगारांच्या सहकारी संस्थांना पाठबळ देण्याची आवश्यकता,

असुधारित प्रत

गृहनिर्माण संस्थांच्या स्वयं पुनर्विकाससंबंधात स्वतंत्र धोरण आणण्याची आवश्यकता, राज्यातील सहकारी चळवळ बळकट करण्याची व पतपेढ्यांमधील ५ लाखापर्यंतच्या ठेवींना संरक्षण देण्याची आवश्यकता, राज्यातील प्रगत शिक्षण संस्थापैंकी काही संस्था राजकीय अड्डे बनले असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणारा विपरीत परिणाम, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## — अशासकीय कामकाज —
## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**नऊ : (क) अशासकीय विधेयके :-**

**पुर:स्थापनार्थ** —

**(१)** "सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक १ — महाराष्ट्र राज्यात लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती, जाहिरात-फलक लावण्यास, समाज माध्यमांवर व संकेतस्थळांवर प्रसिद्ध करण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०२३" — श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे.

**(२)** "सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक २ — महाराष्ट्र अल्पभूधारक शेतकरी यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०२३" — श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे.

**(३)** "सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ३ — महाराष्ट्र राज्यातील युवक-युवतींना बेरोजगारी भत्ता विधेयक, २०२३" — श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे.

**(४)** "सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ४ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३" - श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे.

**(५)** "सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०२३" - श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे.

**(६)** "सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ६ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२३" - श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे.

अप्रकाशित प्रत

**(७)** "सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ७ - महाराष्ट्र राज्यातील बेकारीचे निर्मुलन करण्याबाबत विधेयक, २०२३" - श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांचे.

---

**(ख) विचारार्थ -**

**(१)** "सन २०२१ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण विधेयक, २०२१" - श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांचे

**(२)** "सन २०२१ चे वि.प.वि. क्रमांक ७ - महाराष्ट्र धर्म द्वेषास आणि प्रेषित, पैगंबर व धर्मस्थाने यांची विडंबना करण्यास प्रतिबंध करण्यास विधेयक, २०२१" - श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांचे

---

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २३ मार्च, २०२३.

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

अस्वाक्षरित प्रत